# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०—२५६०११८९
२५६०११९०
टेलीग्राफ : 'युनिपुना'
टेलेक्स : १४५ ७७१९ युनीप इन
फॅक्स नं. : ०२०—२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ernet.in

गणेशखिंड,पुणे ४११००७

आरक्षण कक्ष
संदर्भ क्र. आरक्षण/ओ २२/९७४
दिनांक — २६/८/२०११

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय —मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या दृष्टीने विशेष मोहिम राबविण्याबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या दृष्टीने विशेष भरती मोहिम राबविण्यासंदर्भात शासनाने निर्गमीत केलेला शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.८६/२०११/१६—ब, दि. २ ऑगस्ट, २०११ सोबत जोडत आहे. तरी विहित कार्यपध्दती अवलंबून शासनाने दिलेल्या मुदतीत अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही व्हावी, ही विनंती.

कळावे,

आपला,

26/8/2011
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबत — वरीलप्रमाणे

मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या
दृष्टीने विशेष मोहीम राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०२ ऑगस्ट, २०११

वाचा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: असंक १०१०/ प्र.क्र.१/२०१०/ वित्तीय सुधारणा-१, दिनांक ५.६.२०१०
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:पदनि २०१०/प्र.क्र. ८३/२०१०/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २९.११.२०१०
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब, दिनांक १३ एप्रिल,२०११
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:पदनि २०११/प्र.क्र. ११०/११/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ३०.०६.२०११

<u>प्रस्तावना</u> :- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : असंक १०१०/ प्र.क्र.१/२०१०/ वित्तीय सुधारणा-१, दिनांक ५.६.२०१० अन्वये शासकीय विभाग/कार्यालये, शासन अनुदानित संस्था इत्यादीमधील गट-क व गट-ड संवर्गातील पदभरतीस दिनांक ५.६.२०१० पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी निर्बंध घालण्यात आले आहेत. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:पदनि २०११/प्र.क्र. ११०/११/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ३०.०६.२०११ अन्वये निर्बंधाचा कालावधी आणखी एका वर्षासाठी वाढविण्यात आला आहे. दिनांक १४.४.२०११ पासून मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी २०११/प्र. क्र. ८६ /२०११/१६-ब, दिनांक १३ एप्रिल, २०११ अन्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत :-

१) गट-अ व गट-ब संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची विशेष मोहीम सुरु करण्यात यावी.
२) गट-क व गट-ड संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची पदभरतीची प्रक्रिया सुरु करण्याकरिता वित्त विभागाच्या दिनांक २९.११.२०१० च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून विशेष मोहीम सुरु करण्यात यावी.

गट-क व गट-ड संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या प्रक्रियेस उपरोक्त कार्यपद्धतीनुसार थोडा विलंब लागू शकतो, त्यामुळे याबाबतीत सुधारित आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

गट-क व गट-ड संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याकरिता शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:पदनि २०१०/प्र.क्र. ८३/२०१०/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २९.११.२०१० अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली समितीची मान्यता घेण्याची आवश्यकता रहाणार नाही, म्हणजेच पर्यायाने सदर शासन निर्णयातील परिच्छेद (ब) मध्ये क्रमांक ४ पुढे दर्शविलेली कार्यपद्धती अनुसरण्याची आवश्यकता रहाणार नाही. अनुशेषाची पदे भरण्यासाठी नियमित कार्यपद्धती अनुसरण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे प्रत्येक संवर्गातील पदांच्या अनुशेषाची परिगणना करण्यात यावी. गट-अ, गट-ब, गट-क आणि गट-ड च्या पदांमधील सरळसेवा भरती व पदोन्नती यामधील अनुशेष

मार्च, २०१२ पर्यंत भरण्याची कार्यवाही संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करावी. याप्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.

सदर शासन निर्णय सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावा.

**सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.**

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०८०२१९१२४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही /-
( के. पी. बक्षी )
प्रधान सचिव (सेवा)

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

(शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब, दिनांक ०२.०८.२०११ चे सहपत्र.)

विवरण पत्र -१ (सरळ सेवेकरिता ) (गट- अ, ब, क, ड यातील प्रत्येक संवर्गनिहाय)

संवर्गाचे नांव :-

| | | एकूण | SC | ST | VJ[A] | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | मंजूर पदे | | | | | | | | | | |
| (ब) | भरलेली पदे | | | | | | | | | | |
| (क) | भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार किती पदे भरणे आवश्यक [एकूण भरलेली पदे x आरक्षणाची टक्केवारी ] / १०० | | | | | | | | | | |
| (ड) | अनुशेष (ब) - (क) | XXX | | | | | | | | | XXX |

उदा. :- एकूण मंजूर पदे १६० असतील तर आरक्षणानुसार भरणे आवश्यक असलेली पदे अजा-२१, अज-११, विजाअ-५, भजब-४, भजक-६, भजड-३, विमाप्र-३, इमाव-३०, खुला-७७ अशी रहातील. जर भरलेली एकूण पदे १२० असतील तर एकूण भरलेल्या १२० पदांचे आरक्षण (अजा-१६, अज-८, विजाअ-४, भजब-३, भजक-४, भजड-२, विमाप्र-२, इमाव-२३) व खुला-५८ विचारात घेता, जर समजा विविध आरक्षणातील प्रवर्गाची भरलेली पदे अजा-१४, अज-०६, विजाअ-३, भजब-३, भजक-४, भजड-१, विमाप्र-१, इमाव-२३ याप्रमाणे असतील तर अनुशेष अजा-२, अज-२, विजाअ-१,भजब-०, भजक-०, भजड-१, विमाप्र-१, इमाव-० याप्रमाणे राहील.

विवरण पत्र - २ (पदोन्नतीकरिता) (गट- अ, ब, क, ड यातील प्रत्येक संवर्गनिहाय)

संवर्गाचे नांव :-

| | | एकूण | SC | ST | VJ[A] | NT-B | NT-C | NT-D | SBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | मंजूर पदे | | | | | | | | | |
| (ब) | भरलेली पदे | | | | | | | | | |
| (क) | भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार किती पदे भरणे आवश्यक [एकूण भरलेली पदे x आरक्षणाची टक्केवारी ] / १०० | | | | | | | | | |
| (ड) | अनुशेष (ब) - (क) | XXX | | | | | | | | XXX |